# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १२२५/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. विठ्ठल चिंधुजी बनगैय्या, मु. शिवनगर परसोडा, पो. के.के.नगर, ता. रामटेक जि. नागपूर-४४११०६ | सहा. नगर रचनाकार, नगर परिषद, रामटेक, ता. रामटेक जि. नागपूर | मुख्याधिकारी, नगर परिषद, रामटेक, ता. रामटेक जि. नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १२.११.२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०२.०५.२०२२

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : मागितलेली माहिती देण्यात आली नाही. चुकीची माहिती देण्यात आली.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती देण्याची विनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ३०.११.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ३०.११.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : १६.११.२०२१

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : तहसिलदार रामटेक, यांना आपले कार्यालयाचे पत्र क्र./नपरा/बांध/टावर अति. तक्रार १६८/२०२१, दिनांक १६.११.२०२१ मध्ये अतिक्रमणा संबंधाने नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे व माहिती या विषयासंदर्भात एकूण २ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी तथा सहा. नगर रचनाकार, नगर परिषद रामटेक यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

४. **प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ३१.१२.२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०१.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक ०२.०२.२०२२ रोजी सुनावणी घेवून, दिनांक २१.०२.२०२२ अन्वये, जन माहिती अधिकारी तथा सहा. नगर रचनाकार यांनी सदर आदेश मिळाल्याचे १५दिवसाचे आत पोलीस स्टेशन रामटेक येथे संपर्क साधून पो.स्टेशन रामटेक येथे दि. २२.१०.२०१३ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबतची चौकशी करुन माहिती प्राप्त करुन प्रकरण अपिलार्थीला याबाबत अवगत करावे. अपिलकर्ताचे समाधान झाल्यामुळे सदर प्रकरण नस्ती करण्यात येते, असे आदेश पारीत केले आहे.

५. **युक्तीवाद/लेखी खुलासा —**

आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी स्पष्ट केले की, माहिती अर्जानुसार अद्यापही माहिती मिळालेली नाही. प्राधिकरणाच्या वतीने कोणीही उपस्थित नसून त्यांनी कोणताही लेखी खुलासा/युक्तीवाद आयोगास सादर केलेला नाही.

६. **निष्कर्ष —** सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय आदेशानुसार अपिलार्थीस माहिती प्रदान केलेली नाही, त्यामुळे अपिलार्थी हे विनामुल्य माहिती प्राप्त करुन घेण्यास पात्र ठरतात.

२) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांचेकडून कलम २०अन्वये खुलासा मागविणे क्रमप्राप्त ठरते.

## अंतरिम आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. नगर रचनाकार, नगर परिषद रामटेक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोहच देय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. नगर रचनाकार, नगर परिषद रामटेक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास हा आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत व्यक्तीश: सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना मिळेल याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

४) सदर प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्वसुचना न देता अथवा पुर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी व्दितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण२०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांना आदेशित करण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.११.२०२४**

**प्रत,**

**जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांना वरील आदेश क्र. ४ च्या अंमलबजावणीसाठी अग्रेषित.**

जावक क्रमांक 252 दिनांक 13 JAN 2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर